CMS Connecting Commerce

**Date:** 09 December 2016
**Publication:** Sakal
**Edition:** Mumbai

# महिनाभरानंतरही कोंडी कायम

## फेरबदल झालेली एटीएम रकमेच्या प्रतीक्षेत

**सकाळ न्यूज नेटवर्क**

मुंबई, ता. ८ : नोटाबंदीला महिना पूर्ण झाला असला तरी बाजारात नव्या चलनी नोटांची टंचाई कायम आहे. एटीएम फेरबदलाचे लक्ष्य कॅश लॉजिस्टिक कंपन्यांनी महिनाभरात पूर्ण केले; मात्र या बहुतांश एटीएममध्ये रक्कमच नाही. रकमेच्या प्रतीक्षेत असलेल्या एटीएममुळे नागरिकांची आर्थिक कोंडी सुरूच आहे.

कॅश मॅनेजमेंटमधील आघाडीची कंपनी असलेल्या सीएमएसने आठवड्यापूर्वी एटीएममध्ये आवश्यक फेरबदल पूर्ण केले. दिवसाला सरासरी १२ हजार ५०० ते १५ हजार एटीएममध्ये नव्या नोटांसाठी हे फेरबदल करण्यात आल्याची माहिती सीएमएस इन्फो सिस्टीमच्या प्रवक्ता संध्या मेनन यांनी दिली. त्या म्हणाल्या की, रिझर्व्ह बँकेच्या विशेष पथकाच्या मार्गदर्शनाखाली देशभरातील जवळपास ९५ टक्के एटीएमचे फेरबदल पूर्ण झाले आहेत.

शहरांतील जवळपास १०० टक्के एटीएमचे फेरबदल झाल्याचा दावा त्यांनी केला. एटीएम अभियंत्यांना पोहचणे कठीण आणि वाहतुकीदरम्यान सुरक्षेचा प्रश्न असलेली निमशहरे किंवा गावातील एटीएम सुरू करण्यास आठवडा लागेल, असे मेनन यांनी सांगितले.

**केवळ ३० टक्केच भरणा**

नोटाबंदीपूर्वी एटीएममध्ये दर दोन ते तीन दिवसांनी पैसे भरले जात होते. त्यानंतर हे प्रमाण कमालीचे कमी झाले. सध्या एटीएम क्षमतेच्या केवळ ३० टक्केच रक्कम भरली जात आहे. फेरबदलानंतर एटीएमची क्षमता ४० लाखांपर्यंत वाढली आहे. रक्कम टंचाई असल्याने प्रत्येक एटीएममध्ये पाच ते सहा लाख भरले जात आहेत. देशात दररोज सरासरी १५ हजार कोटी एटीएममध्ये भरले जात आहेत.

**कार्डधारकांना २४ तास रोख रक्कम मिळण्याचे एटीएम हे एकमेव साधन आहे. महिनाभरात ९५ टक्के एटीएमचे फेरबदल करण्यात कॅश लॉजेस्टिक कंपन्यांना यश आले. आता नोटांच्या टंचाईने नवे आव्हान उभे राहिले आहे. बँकांकडे पुरेशी रक्कम नसल्याने एटीएमला कमी प्रमाणात रक्कम पुरवठा होत आहे. यावर मार्ग काढल्यास नागरिकांना दिलासा मिळेल.**
**- संध्या मेनन,**
प्रवक्ता, सीएमएस इन्फो सिस्टीम